महा मेट्रो

PUNE METRO

# स्थानिक खासदार अनिल शिरोळे यांची मेट्रो ऑफिस ला भेट

पुणे , १५ जानेवारी २०१९ : पुणे शहरात मेट्रोचे काम अत्यंत वेगाने सुरु असून शहरात सर्वच जनप्रतिनिधींचे या कामाला सहकार्य मिळत आहे . मेट्रो कामच आढावा घेण्यासाठी स्थानिक खासदार अनिल शिरोळे यांनी दि . १५.१.२०१९ रोजी सिव्हिल कोर्ट कार्यालयात भेट दिली . महामेट्रोचे एम डी ब्रिजेश दीक्षित यांनी आतापर्यन्त झालेल्या कामाचा वृत्तांत माननीय खासदारांपुढे ठेवला . महामेट्रोचे प्रायोजित नवीन प्रकल्प आणि त्यांची रूपरेखा यांची चर्चा या मिटिंग मध्ये झाली .या प्रसंगी श्री . सिद्धार्थ शिरोळे स्थानिक नगरसेवक हेदेखील उपस्थित होते .

या प्रसंगी प्रस्तावीत कोथरूड कोच डेपोच्या कामाचा आराखडा मा.खासदार महोदयांना दाखविण्यात आला . कोथरूड डेपोचा आराखडा अत्यंत अत्याधुनिक अशा तंत्रावर आधारित असून या परिसराचा आमूलाग्र बदल यामुळे होणार आहे . सिव्हिल कोर्ट येथील प्रास्तवित मेट्रो स्थानकाबद्दल देखील विस्तृत चर्चा प्रसंगी झाली . या ठिकाणी सध्याच्या तिन्ही मेट्रो लाईन एकत्र येणार आहेत . यामुळे प्रवाशांना सहज एका मेट्रो लाईन मधून दुसऱ्या लाईन मध्ये जाता येइल.

श्री . अनिल शिरोळे यांचे महामेट्रोला सहकार्य मिळत आहे . त्यामुळे महामेट्रोने त्यांचे आभार प्रदर्शन केले आहे . श्री . सिद्धार्थ शिरोळे यांचे ही वेळोवेळी मेट्रो कामासाठी सहकार्य मिळत असते .